# निशाणी क्रमांक २४ वरील आदेश

( प्रयागा वि. खंडु व ईतर )

१. वादीच्या वतीने मयत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी व त्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ खंडु शिवराम जायभाय हे दि. २५.०२.२०२३ रोजी व प्रतिवादी क्र. २ भिमाबाई खंडु जायभाय या दिनांक ०९.११.२०१९ रोजी मयत झालेले आहेत. त्यानंतर, दि. ०२.०८.२०२४ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

४. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुद्ध वाटप, जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी सदर अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतलेली आहे. तथापी, दाव्याचे स्वरुप विचारात घेता आणि दावा गुणदोषावर अंतीमतः निर्गत करण्याच्या दृष्टीने मयत प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरूद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश व त्यासाठी झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे.

५. जरी, मयत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरूद्ध अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी व त्यासाठी झालेला विलंब माफ करण्यास उशीर झालेला असला तरी, न्यायाच्या दृष्टीने वादीवर खर्च लादून मयत प्रतिवादी

क्र. १ व २ यांच्याविरूद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे व त्यासाठी झालेला विलंब माफ करणे न्यायतत्वानुसार योग्य व उचीत होईल. सबब, सर्व बाबींचा सारासार विचार करता प्रस्तुत अर्ज वादीवर खर्च लादून मंजुर करणे न्यायोचीत होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज नि. क्र. २४ खर्च म्हणुन रक्कम रू. ५००/- वादीने प्रतिवादींना एकत्रीतरित्या देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. मयत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून त्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2025.02.10 18:50:50 +0630

( व्ही. व्ही. जोशी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः १०/०२/२०२५.